नि.फौ.ख.क्र.४७/२०२४
सरकार वि.दिपक
नि.क्र.१३

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–प्रदिप शालिकराव गावंडे,
वय:–४५ वर्ष, व्यवसाय–दुकाण,
राह.सिर्सी ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

१. पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समन्सपत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीती नाही. सहीला **निशानी क्र. १४** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता सहीपुरता **निशानी क्र.१५** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला यापुर्वीच **आर्टीकल अ** देण्यात आले.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०४/०२/२०२४ रोजी मौजा महालगाव ते सिर्सी रोड येथे पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समन्सपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दिवशी घटनास्थळावर गेलो व माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष एक बारा चक्का टिप्पर व १० ब्रास रेती जप्त केली होती. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.सलीम शेख यांनी उलटतपास नाकारला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१९.११.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड